**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ३५ दिनांक ०५/०७/२०२४**

# पालघर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२२-२३ लेखी परीक्षेकरीता येणाऱ्या उमेदवारांना राहण्याची व्यवस्था केलेबाबत.

महाराष्ट्र पोलीस शिपाई भरती – २०२२-२३ च्या अनुषंगाने पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाच्या ५९ (३३ पुरुष, १९ महिला पोलीस शिपाई पदे व ७ बँड्समन पदे) रिक्त पदांच्या जागेसाठी लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा दि.०७/०७/२०२४ वार रविवार रोजी सकाळी १०:०० वाजता सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, खारेकुरण रोड, पालघर पश्चिम ता. जि. पालघर येथे घेण्यात येणार असून उमेदवारांना सकाळी ठिक ०८:०० वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावयाचे आहे.

सदर लेखी परीक्षेकरीता महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून उमेदवार येणार आहेत. त्यामुळे त्यांची पालघर येथे आल्यानंतर गैरसोय होवू नये याकरीता खालील ठिकाणी त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

- **पुरुष उमेदवार यांचेसाठी राहण्याची व्यवस्था :- लायन्स क्लब, कचेरी रोड, पालघर**
- **महिला उमेदवार यांचेसाठी राहण्याची व्यवस्था :- श्री अंबामाता मंदिर हॉल, पाचबत्ती, पालघर**

सदर बाबत काही अडचण असल्यास श्री. अनंत पऱ्हाड, प्रभारी अधिकारी पालघर पोलीस ठाणे यांना ९३७२२८७२५४ किंवा श्री. सुयोग कांबळे, पालघर पोलीस ठाणे यांना ९५५२३२४५९५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.